**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**गुरुवार दिनांक १५ ऑक्टोबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या दिवाळीतली एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द.**
2. **सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी साठाविषयक नियमांमध्ये सुधारणा.**
3. **धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात अनुयायांसाठी व्यापक व्यवस्था; चंद्रपूरातही विविध कार्यक्रमांचं आयोजन.**
4. **चंद्रपूरच्या पाच दिवसीय माता महाकाली महोत्सवाला साध्या पद्धतीने सुरुवात.**

**आणि**

5. **पूर्व विदर्भाची जीवनवाहिनी असलेल्या गोसेखुर्द धरणात शंभर टक्के पाणीसाठा.**

**आता सविस्तर बातम्या .......**

हंगामी भाडेवाढ

राज्यातली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, यंदाच्या दिवाळीत एसटीची हंगामी भाडेवाढ केली जाणार नाही, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज सांगितलं. सणासुदीच्या हंगामात दर वर्षी प्रमाणे यंदा १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनानं सादर केला होता. मात्र, आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर अतिरिक्त भार टाकणं योग्य नसल्याची भूमिका घेत, परिवहन मंत्र्यांनी हा प्रस्ताव फेटाळला.

साखरेची साठेबाजी

सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि साखरेचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारने साठाविषयक नियमांमध्ये सुधारणा केली आहे. आता साखर व्यापाऱ्यांना केवळ १५ दिवसांपर्यंतच साखर साठवून ठेवता येईल. हे नियम आजपासून येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहतील, असं ग्राहक व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे. सुधारित नियमांनुसार, कोलकाता आणि त्याच्या विस्तारित महानगर क्षेत्रासाठी तसंच, आसाममधे साठ्याची मर्यादा २ हजार क्विंटल इतकी निश्चित करण्यात आली आहे.

मंत्री मुरलीधर मोहोळ

महाराष्ट्रातील हवाई संपर्क व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी केंद्र सरकारच्या सुधारित उडान योजनेअंतर्गत सोलापूर-मुंबई आणि अमरावती-पुणे या हवाई मार्गांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज ही घोषणा केली. या दोन्ही मार्गांवर दोन्ही दिशांनी विमानसेवा सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. यामुळे सोलापूर-मुंबई आणि अमरावती-पुणे या शहरांदरम्यान थेट हवाई संपर्क उपलब्ध होणार आहे. या सेवांचा विद्यार्थ्यांसह उद्योजक, व्यापारी, पर्यटक आणि अन्य प्रवाशांना लाभ होण्याची अपेक्षा आहे.

व्यापक व्यवस्था

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त दीक्षाभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी प्रशासनाने व्यापक व्यवस्था केली आहे. परिसरात १ हजार १८९ स्वच्छतागृहे उभारण्यात येत असून, त्यापैकी सुमारे निम्मी महिलांसाठी असतील. यंदा प्रथमच प्रशासनातर्फे अनुयायांसाठी निवास व्यवस्थाही करण्यात येत आहे. सुरक्षा आणि व्यवस्थापनासाठी दक्षिण प्रवेशद्वाराजवळ केंद्रीय नियंत्रण कक्ष उभारण्यात येणार असून, सीसीटीव्हीद्वारे संपूर्ण परिसरावर लक्ष ठेवल जाणार आहे. अनुयायांसाठी तीन ठिकाणी वैद्यकीय कक्ष, १०८ रुग्णवाहिका आणि कार्डियाक व्हॅनची व्यवस्था करण्यात येणार आहे. शुद्ध पाणी, नियमित स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि डास नियंत्रणावरही भर देण्यात येणार आहे. आपत्कालीन मदतीसाठी १८०० १२३०० ६१ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला आहे. सर्व सुविधा निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

धम्मचक्र अनुप्रवर्तन

चंद्रपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर ७० व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून, दोन दिवसीय कार्यक्रमात भिक्खुगण, बौद्ध आणि आंबेडकरी विचारवंत, साहित्यिक यांच्या सहभागासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश आहे. आज सायंकाळी साडेचार वाजता धम्मध्वजारोहण पार पडला. उद्या, १६ ऑक्टोबरला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पवित्र अस्थिकलश यात्रा दीक्षाभूमीकडे रवाना होईल. सायंकाळी ६ वाजता मुख्य सोहळा, तर रात्री बुद्ध-धम्म गीतांचा कार्यक्रम होणार आहे. दीक्षाभूमीवरील बुद्धविहारात १६ पूर्णांक ५ फूट उंचीच्या बुद्धमूर्तीचे दर्शनही अनुयायांना घेता येणार आहे.

सागरमाला कार्यक्रम-सेवा संकल्प

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७ च्या दिशेनं होत आहे. यानिमित्त विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत सागरमाला कार्यक्रमाबाबत -

***२०१५ मध्ये सुरू झालेल्या सागरमाला कार्यक्रमाचा उद्देश भारताच्या किनारपट्टीचा आर्थिक विकासासाठी प्रभावी वापर करणे आणि बंदरांच्या माध्यमातून व्यापाराला चालना देणे हा आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, रस्ते-रेल्वे संपर्क, औद्योगिकीकरण, किनारी समुदायांचा विकास आणि जलवाहतुकीला प्रोत्साहन या पाच क्षेत्रांवर कार्यक्रमाचा भर आहे. या अंतर्गत ६ लाख ६ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे ८४५ हून अधिक प्रकल्प निश्चित करण्यात आले असून, ३१५ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. भारताच्या प्रमुख बंदरांची माल हाताळण्याची क्षमता २०१४ मधील ८७३ दशलक्ष मेट्रिक टनांवरून २०२६ मध्ये १ हजार ७२८ दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढली आहे. भारताचा सुमारे ७० टक्के व्यापार सागरी मार्गाने होत असल्याने या कार्यक्रमाच महत्त्व अधोरेखित होत.***

अभिजित वंजारी

नागपूरच्या भूमीतून संविधान, लोकशाही आणि सामाजिक न्यायाच्या रक्षणासाठी भाजप आणि संघाच्या विचारांना पराभूत करण्याचे आवाहन काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी सिरिवेल्ला प्रसाद

यांनी केलं. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातील काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजित वंजारी यांच्या प्रचारार्थ दत्तात्रय नगर येथील महाकालकर सभागृहात कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. नाना पटोले आणि सुनील केदार यांनीही कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करून वंजारी यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केलं.

सुधाकर कोहळे

नागपूर पदवीधर मतदारसंघाचे भाजपाचे उमेदवार सुधाकर कोहळे यांच्या प्रचारार्थ त्रिमूर्तीनगर आणि सुभाषनगर मंडळात पदवीधर मेळावे आयोजित करण्यात आले. मतदारांशी वैयक्तिक संपर्क आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या बळावर विजय मिळवण्याचा निर्धार कोहळे यांनी व्यक्त केला. मतदार नोंदणी केलेल्या पदवीधरांशी पुन्हा संपर्क साधून त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करावे, असं आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केलं.

माता महाकाली महोत्सव

चंद्रपूर इथं आज पासून माता महाकाली महोत्सवाला सुरुवात झाली असून हा महोत्सव पाच दिवस चालतो. आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री महाकाली माता समितीच्या वतीने या महोत्सवाचं आयोजन करण्यात येत. एकवीरा देवीच्या मंदिरातून मातेच्या चांदीच्या मूर्तीची पालखीतून मिरवणूक महाकाली मंदिरात नेण्यात येते. सध्या महाराष्ट्रातील दुष्काळाची परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन यावर्षीचे मनोरंजनात्मक आणि भक्ती संगीताचे सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. दर वर्षी मोठ्या थाटामाटात साजरा होणारा हा उत्सव यंदा अंत्यंत साध्या पद्धतीने साजरा होणार आहे. या कार्यक्रमांवर होणारा खर्च दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी दिला जाणार असल्याचं आमदार जोरगेवार यांनी सांगितलं.

गोसेखुर्द धरण

पूर्व विदर्भाची जीवनवाहिनी ठरणारं गोसेखुर्द धरण शंभर टक्के भरलं आहे. मध्य प्रदेशातल्या पावसामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह सुरू राहिल्यानं धरणातल्या पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे भंडारा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांमधे पिण्याचं पाणी, शेती आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्याची आशा निर्माण झाली आहे.

कर्ज पुनर्गठन

यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेतीशी निगडित कर्जवसुलीस स्थगिती देण्यात आली असून, पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात पुनर्गठन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. खरीप २०२६ मधील पात्र शेतकऱ्यांच्या संमतीने ही प्रक्रिया करण्यात येणार असून, सर्व बँकांनी ३० एप्रिल २०२७ पर्यंत पुनर्गठन पूर्ण करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. पुनर्गठन झालेल्या शेतकऱ्यांना पुढील खरीप हंगामासाठीही पीक कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बँकांकडून अडचणी किंवा कर्जवसुलीसाठी तगादा लावला जात असल्यास जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करावी, असं आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केलं आहे.

एफएफएस प्रणाली

अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांत २२ ऑक्टोबर २०२६ पासून ‘फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल’ (एफएफएस) या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना मोबाईल ॲपवरून घरबसल्या खतांची बुकिंग करता येणार आहे.

ॲपवर अधिकृत विक्रेते आणि उपलब्ध खतसाठ्याची माहिती मिळणार असून, बुकिंगनंतर क्युआर कोड किंवा टोकनच्या आधारे खत खरेदी करता येईल. यासाठी शेतकऱ्यांकडे 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी' असणे आवश्यक आहे. या प्रणालीबाबत कृषी विभागामार्फत गावपातळीवर जनजागृती आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जागतिक पांढरी काठी दिन

आज 15 ऑक्टोबर  जागतिक पांढरी काठी दिन. या दिवसाचा उद्देश दृष्टिदोष आणि अंधत्वाबाबत जनजागृती करणे, दृष्टिहीन व्यक्तींच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि नेत्रआरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा आहे.

कुस्ती जागतिक अजिंक्यपद

लास वेगास इथं सुरू असलेल्या २३ वर्षांखालच्या कुस्ती जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा विश्वजीत मोरे यानं ग्रीको रोमन प्रकारात विक्रमी रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात केवळ एका गुणाच्या फरकाने त्याचं सुवर्णपदक हुकलं. ग्रीको रोमन प्रकारातलं भारताचं हे पहिलंच रौप्यपदक आहे. यापूर्वी विश्वजीतनं या स्पर्धेत २ वेळा कांस्यपदक पटकावलं होतं.

वाचन प्रेरणा दिन

भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रामदासपेठ येथील डॉ.व्ही.बी.कोलते ज्ञानस्रोत केंद्रात आज पुस्तक प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. याशिवाय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासन आणि गांधी विचारधारा विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा दिन आणि वाचन प्रेरणा दिनानिमित्त उद्या १६ ऑक्टोबर रोजी विशेष परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं आहे. 'श्रीधरानंद शास्त्री पातूरकर यांचे महानुभाव साहित्य आणि संशोधनातील योगदान' हा या परिसंवादाचा विषय आहे.

****